महाराष्ट्र शासन
क्रमांक संगृटी-२०१४/प्र.क्र.८२/१४-ब
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ३ जून, २०१४

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यामध्ये विविध ठिकाणी उभारण्यात येत असलेल्या मोबाईल टॉवरसाठी एकसूत्री धोरण / नियमावली / विनियम तयार करुन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ४ मार्च, २०१४ रोजी अधिसूचना जारी करून ती महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध केली आहे. सदर अधिसूचनेद्वारे मोबाईल टॉवर ज्याठिकाणी उभारावयाचे आहेत त्या ठिकाणच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे खेरीज ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याची अट नमूद केली आहे, आणि

२. ज्याअर्थी सहकारी संस्थेच्या सर्वसाधारण बैठकीकरिता, अन्य कार्यांच्या व्यग्रतेमुळे अथवा वेळेच्या अनुपलब्धतेमुळे ब-याच सदस्यांचा उपस्थित राहण्याकडे कल दिसून येत नाही. त्यामुळे उपस्थित सभासदांमधील बहुमताआधारे ठराव पारीत करण्यात येवून त्याआधारे संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाते. त्यामुळे मोबाईल टॉवर/जाहिरात फलकाच्या उभारणी संदर्भात तसेच त्यापासून होणाऱ्या प्रस्तावित संबंधित संस्थेच्या सभासदांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत, आणि

३. ज्याअर्थी, वरवेगळ्या सामाजिक संस्था व गृहनिर्माण संस्थांचे फेडरेशन यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेता, नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेमधील ठरावानुसारचा निर्णय हा, शासन वेळोवेळी अधिसूचित करेल अशा विशिष्ट प्रयोजनांसाठी विहित करेल अशा अटींवर, एकूण सभासदांपैकी उचित सभासद संख्ये एवढ्या सभासदांच्या संमतीसह ना-हरकत प्रमाणपत्र देणे बंधनकारक करणे आवश्यक आहे, आणि

ज्याअर्थी, सदर तरतूद बंधनकारक करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० सुधारित करणे, हा योग्य शासनाचा निर्णय [illegible]

[illegible] मोबाईल टॉवर निर्देश-I [illegible]